# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १९८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.०६ ऑगस्ट २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही; भुजबळांची कबुली

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- लाडकी बहीण योजनेचा फटका आता आनंदाचा शिधा योजनेला बसणार असून यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही. लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने आनंदाचा शिधा देऊ शकत नाही असं राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले. सणासुदीच्या काळात राज्यातील गरीबांना केवळ १०० रुपयांमध्ये चार वस्तू या योजनेच्या माध्यमातून देण्यात येतात. राज्यातील तिजोरीतील एकदम ४५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण योजनेसाठी द्यावे लागणार आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम इतर योजनांवर थोडा थोडा होत असल्याचं छगन भुजबळांनी कबुल केलं. आम्ही आता राज्य सरकारचं उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सध्या योजनांच्या निधी बाबत मागेपुढे होतं असलं तरी आम्ही निधी उपलब्ध होईल तशी योजना चालवत राहू असंही छगन भुजबळ म्हणाले. छगन भुजबळ म्हणाले की, आनंदाचा शिधा द्यायचा असेल तर त्यासाठी दोन ते तीन महिने आधी टेंडर काढावे लागते. आता तरी हे शक्यत नाही. आनंदाचा शिधा आत्ता मिळणार नाही. टेंडर त्यासाठी काढाव लागतं त्यासाठी दोन तीन महिन्यांचा कालावधी लागतो. आता तरी हे शक्य नाही. वर्षाला शिवभोजन थाळी साठी १४० कोटी रुपये तर आनंदचा शिधा साठी ५५० कोटी रुपये लागत होते.

## 'स्पा सेंटर'च्या नावाखाली शिवसेना पदाधिकारी चालवायचा कुंटणखाना

नांदेड दि.५ (प्रतिनिधी)- शहरातील कॅनल रोडवर असलेल्या रेड ओक स्पा टू सेंटरवर पोलिसांनी छापा टाकला आहे. स्पा सेंटरच्या नावाखाली येथे अश्लील प्रकार सुरू असल्याचा पोलिसांना संशय होता. त्यावरून छापा टाकला असता स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे शिंदे यांच्या शिवसेना पक्षाचा नांदेड दक्षिण युवासेना जिल्हाध्यक्ष अमोद साबळे हा पदाधिकारी स्पा सेंटरचा मालक होता. स्पा सेंटरच्या नावाखाली शिवसनेचा पदाधिकारी (पान ४ वर)

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका दिवाळीनंतरच

### राज्य निवडणूक आयुक्तांचे सूतोवाच; निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर होणार नाही

नाशिक दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक दिवाळीनंतर म्हणजे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी दिली. विशेष म्हणजे या निवडणुकीत ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट मशीनचा वापर होणार नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे विरोधी पक्षांनी यापूर्वी अनेकदा ईव्हीएम व व्हीव्हीपॅटमधील मतांची जुळवणी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आयोगाच्या व्हीव्हीपॅट न वापरण्याच्या निर्णयावर मोठा वाद होण्याची शक्यता आहे.




राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी नाशिक विभागातील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. या बैठकीला नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यात दिवाळीनंतर टप्याटप्याने निवडणूक होणार असल्याची माहिती दिली.

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाने ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिलेत. त्यानुसार, मनपा, जिल्हा परिषद व नगपालिका अशा सर्वच निवडणुकांचा टप्प्याटप्याने कार्यक्रम आखण्यात येणार आहे. नाशिक विभागात एकूण ५० लाख ४५ हजार मतदार व ४८८२ मतदान केंद्र आहेत. यासाठी ८७०५ कंट्रोल युनिट्स व १७ हजारांहून अधिक मतदान यंत्रांची गरज आहे. सर्व निवडणुका एकाचवेळी घेतल्या तर मनुष्यबळाची समस्या निर्माण होईल. त्यामुळे या निवडणुका टप्प्याटप्याने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पण कोणत्या संस्थेची निवडणूक प्रथम होणार, हे अद्याप निश्चित करण्यात आले नाही.

## २४ तासात भारतावर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लादणार

### डोनाल्ड ट्रम्प यांचा थेट इशारा

वॉशिंग्टन दि.५ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांची जगात चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भारतावर देखील २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. एवढंच नाही तर भारताकडून दंड वसूल करण्याचाही इशारा ट्रम्प यांनी दिला. एका मुलाखतीत डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर येत्या २४ तासात टॅरिफ वाढवणार असल्याची घोषणा केली आहे. मुलाखतीत ट्रम्प म्हणाले की मला वाटतं येत्या २४ तासात भारतावर मोठ्या प्रमाणात टॅरिफ वाढवणार आहे. भारत रशियाकडून



मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्याच्या मुद्यांवरून डोनाल्ड ट्रम्प हे आक्रमक होत आहेत. यावरून ट्रम्प सातत्याने भारतावर आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची धमकी देत आहेत.

दरम्यान, आता ट्रम्प यांनी भारताला पुन्हा एकदा धमकी देत टॅरिफमध्ये आणखी मोठी वाढ करण्याचा इशारा दिला आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या मुद्यांवरून ट्रम्प हे भारतावर टीका करत आहेत. आज पुन्हा याच मुद्यांवरून ट्रम्प यांनी भारतावर घणाघाती टीका केली आहे. तसेच पुढील २४ तासांत भारतावर पुन्हा अतिरिक्त कर लादण्याचा इशारा एका मुलाखतीत बोलताना दिला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

'भारत हा एक चांगला व्यापारी भागीदार नाही. भारत आमच्याबरोबर व्यापार करतो. मात्र, अमेरिका भारताबरोबर व्यापार करत नाही. भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, आता मला वाटतं की, पुढील २४ तासांत भारतावर आणखी जास्त टॅरिफ आकारावं. कारण भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे, म्हणजेच युद्ध यंत्रणेला इंधन देत आहे', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

## सार्वभौम देशांना त्यांचे व्यापार भागिदार निवडण्याचा अधिकार

### ट्रम्प यांच्या धमकीनंतर रशियाचा भारताला पाठिंबा

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- रशियाकडून तेल घेऊन आणि त्याची विक्री करून भारत मोठा नफा कमावत असल्याचा आरोप अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. यामुळे भारतीय मालवरील आयातशुल्क 'मोठ्या प्रमाणात' वाढविण्यात येईल, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. यानंतर रशियाने त्यांच्याकडून भारत करत असलेल्या तेल आयातीवर बेकायदेशीर व्यापार दबाव आणल्याचा आरोप अमेरिकेवर केला आहे.

'आम्ही अशी अनेक वक्तव्य ऐकली आहेत जी खरंतर धमक्या आहेत, हा देशांनी रशियाबरोबरचे व्यापार संबंध तोडावेत यासाठीचे प्रयत्न आहेत. आम्ही अशी विधाने कायदेशीर मानत नाहीत,' असे क्रेमलिनचे प्रवक्ते दिमीत्री पेस्कोव्ह यांनी माध्यमांना सांगितले.

तसेच पुढे बोलताना त्यांनी सार्वभौम देशांना त्यांचे व्यापर भागिदार निवडण्याचा अधिकार असल्याचेही त्यांनी म्हटले. पेस्कोव्ह म्हणाले की, 'आमचा विश्वास आहे की सार्वभौम देशांना त्यांचे स्वत:चे (पान ४ वर)

## उत्तरकाशीतील धरालीमध्ये ढगफुटी

### हॉटेल, घरे वाहून गेली; ४ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- उत्तराखंडमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असून राज्यात रेड अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. दरम्यान, उत्तरकाशीतील धरालीमध्ये ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसानंतर अचानक पूर आल्यामुळे भूस्खलन झाल्याची घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून यामध्ये अनेक हॉटेल आणि घरं वाहून गेल्याची माहिती मिळत आहे.

ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसानंतर धरालीमध्ये बचाव पथके दाखल झाली असून बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. स्थानिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येत आहे. भारतीय लष्कर, राज्य आपत्ती दलाचे जवान आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून मदतकार्य करत आहेत. ज्या ठिकाणी ही घटना घडली, हा परिसर हर्षिलपासून १० किलोमीटर अंतरावर असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

अधिकाऱ्यांच्या मते या भागात झालेल्या ढगफुटीमुळे अचानक पूर आला आहे. त्यामुळे या भागातील नदीकाठी असलेले काही हॉटेल्स आणि दुकान आणि काही घरे वाहून गेल्याची



प्राथमिक माहिती सांगण्यात येत आहे. मात्र, किती नुकसान झालं? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. पण प्राथमिक माहितीनुसार येथील मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचं जिल्हाधिकारी प्रशांत आर्य यांनी सांगितलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

## मनसेसोबत युतीचा निर्णय पक्ष घेईल, तुम्ही तयारीला लागा-उद्धव ठाकरे

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- मनसेसोबत युती करायची की नाही याचा निर्णय पक्ष घेईल, तुम्ही सगळ्या जागांसाठी तयारीला लागा असा आदेश उद्धव ठाकरेंनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना दिला आहे. उद्धव ठाकरे यांनी एमएमआर रिजनमधील महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आदेश दिले. येत्या ऑक्टोबरच्या अखेरीस महापालिका निवडणुकीचे आदेश जारी होण्याची शक्यता असून नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये मतदान होण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख त्यासोबतच महत्त्वाचे पदाधिकारी यांच्यासोबत ठाणे, कल्याण डोंबिवली, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, उल्हासनगर , भिवंडी, वसई विरार या ७ महापालिका निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेतला. जिथे जिथे गटप्रमुखांच्या नेमणुका झालेल्या नाहीत तिथे गटप्रमुखांच्या नेमणुका करा, महापालिकेच्या निवडणुकांच्या दृष्टिकोनातून संघटनात्मक तयारी करा अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी बैठकीत दिल्या.

कोर्टाच्या निर्णयानुसार नवीन प्रभाग रचनेनुसार ज्या निवडणुका होणार आहेत त्यावर विशेष लक्ष ठेवा, ज्या गोष्टी घडत आहेत त्याकडे काळजीपूर्वक लक्ष ठेवा (पान ४ वर)

## स्टार्टअपसाठी उद्योजगता धोरण, फ्रेट कॉरिडोअरला मंत्रीमंडळाची मंजुरी

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. आजच्या बैठकीत महाराष्ट्र स्टार्टअप उद्योजकत व नाविण्यता धोरण २०२५ ला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयासह अनेक निर्णय घेण्यात आले असून वाढवण बंदर (तवा) ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग (भरवीर येथे) यांना जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर करता येणार आहे, कॅबिनेट बैठकीत याबाबतच्या सुधारित धोरणास मंजुरी देण्यात आली आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ सह एकूण ७ निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, नागपूर, जळगाव जिल्ह्यातील २ महत्त्वाचे निर्णय आहेत. तसेच, कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी सस्थांच्या अनुदानात वाढ, अनुदान २ हजारांवरून ६ हजार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

कौशल्य व रोजगारमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रिमंडळातील निर्णयाबाबत माहित दिली. त्यानुसार, महाराष्ट्र स्टार्टअप उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५ ला मान्यता देण्यात आली आहे. स्वयंरोजगारासाठी आपण मदत करणार आहोत, ५ ते १० लाख रुपयांचे कर्ज आपण देणार आहोत, अशी माहिती लोढा यांनी दिली. तरुणांना हे कर्ज ३ टक्के व्याजदराने आपण देणार आहोत. आयटीआय किंवा कोणीही ग्रॅज्युएट याचा लाभ घेऊ शकतील. सुरुवातील ५ लाख विद्यार्थ्यांची यात निवड (पान ४ वर)

## 'शिवसेनेचा बाप मीच' म्हणणाऱ्या भाजप आमदाराकडून दिलगिरी व्यक्त

भंडारा दि.५ (प्रतिनिधी)- भंडाऱ्यातील भाजप कार्यकर्ता मेळाव्यात भाजप नेते परिणय फुके यांनी शिवसेनेचा बाप मीच असे शिवसेनेबाबत बोलताना वादग्रस्त वक्तव्य केले होते. दरम्यान फुके यांच्या या वक्तव्यानंतर शिवसेना शिंदे गटाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. फुके यांनी माफी मागावी अन्यथा, शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ असा इशारा या पत्रकार परिषदेमधून शिवसेनेनं फुके यांना दिला गेला होता. आता राज्यभर आरोप प्रत्यारोपांच्या चौफेर फैरी झाल्यानंतर भाजप नेते परिणय फुके यांनी आपल्या वक्तव्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली आहे.

दिलगीरी व्यक्त करताना फुके म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या भंडारा येथील मेळाव्यात कार्यकर्त्यांना संबोधित करताना मी केलेल्या एका विधानामुळे महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा गैरसमज झाला आहे. वास्तविक मला तसे बोलायचे नव्हते. कुणाला दुखविण्याचा माझा हेतू सुद्धा नव्हता. माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला आहे. परंतु, माझ्या विधानामुळे आमच्या मित्र पक्षातील शिवसेनेचे पदाधिकारी- कार्यकर्त्यांच्या भावना दुखवल्या असतील तर त्याबद्दल मी मनापासून सर्वांची दिलगिरी व्यक्त करतो.

## सर्वधर्म समभाव म्हणजे नपुंसकपणा-संभाजी भिडे

### आंबा खाऊन मुलं होतात वक्तव्याचा केला पुनरुच्चार

नाशिक दि.५ (प्रतिनिधी)- सर्वधर्म समभाव म्हणजे नीचपणा आहे. हा प्रकार म्हणजे ना धड स्त्री, ना धड पुरुष म्हणजे नपुंसकपणा आहे, असे वक्तव्य शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थेचे सर्वेसर्वा संभाजी भिडे यांनी केले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीवेळी तिरंगा झेंडा स्वीकारला गेला होता. आपल्याला तिरंगा ध्वज आणि संविधान मानलेच पाहिजे. मात्र, भगवा ध्वज हा हजारो वर्षांपासून देशाचं प्रतीक राहिला आहे. त्यामुळे देव,देश आणि धर्मासाठी कटिबद्ध राहा. १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिन साजरा करु, तिरंगा फडकवू. पण दिल्लीच्या लाल किल्ल्यावर भगवा फडकवण्यासाठी काम करत राहू, असे संभाजी भिडे यांनी म्हटले. ते सोमवारी नाशिक येथील एका कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी संभाजी भिडे यांनी पुन्हा एका त्यांच्या 'आंबा खाऊन मुलं होतात', या वक्तव्याचा उच्चार केला. मी आंबे खाऊन मुल होतं, असे बोललो होतो. मी एक आंब्याचं झाड लावलं आहे. तिथे आजही तुम्ही जाऊन आंबे खाऊ शकता. त्या वक्तव्यावरुन माझ्यावर कोर्टात खटला सुरु आहे, असे संभाजी भिडे यांनी म्हटले.

सोयराबाई यांना जे वाटत होत ते शक्य नव्हते. सोयराबाई यांना छत्रपती संभाजी महाराजांनी राजा व्हावे, असे वाटत नव्हते. मात्र, पुढच्या काळात राजाराम महाराज हे संभाजी महाराज यांच्यानंतर राजे झाले. शिवाजी महाराज आणि (पान ४ वर)

## अन्यथा तुमच्यासह पंतप्रधान मोदींना किंमत मोजावी लागेल; मनोज जरांगेंचा फडणवीसांना इशारा

धाराशिव दि.५ (प्रतिनिधी)- अंतरवाली सराटीत झालेली चूक पुन्हा करू नका, तुम्ही जर काही भानगड करायला जाल तर त्याची किंमत तुमच्यासह पंतप्रधानांना देखील भोगावी लागेल असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

मराठा आंदोलक आणि मराठा आरक्षणाचा लढा देणारे मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा आंदोलनाच्या पवित्र्यात आहे. मराठा समाजाच्या वतीने २९ तारखेला मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज धाराशिव शहरामध्ये जरांगे पाटील यांनी बैठक घेतली. या बैठकीदरम्यान विविध क्षेत्रातील लोकांच्या भेटी घेऊन २९ ऑगस्टच्या मुंबई येथील आंदोलनामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आलंय. यावेळी ते बोलत होते.

एकदा आमचे डोके फुटले, अजूनही आमच्या अंगातल्या गोळ्या निघाल्या नाहीत. आंतरवलीतील आया बहिणींना दुःख सहन करावं लागलं, गुढघ्याचे ऑपरेशन झाले, मांड्यांला टाके घेतलेत. त्यामुळे फडणवीस साहेब तुम्हाला सांगतो पुन्हा ती चूक नाही करायची, आणि त्या भानगडीत पडायचं नाही. मराठ्यांच्या नादी लागायचं नाही, गोडी गुलाबीने तुम्हाला जे करायचं ते करायचं, त्यावेळेस घडलं ते घडलं. आता पुन्हा त्या भानगडीत पडायचं नाही. ही धमकी नाही तुम्हाला मी हे समजून सांगतो, कारण तुम्हाला ती खोड आहे. असा इशारा देत मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली आहे.

## माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन झाल आहे. दिल्लीतील आरएम रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते, अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली, ते ७९ वर्षांचे होते. गोवा, मेघालय, ओडिशा आणि जम्मू काश्मीरचे राज्यपाल म्हणून त्यांनी आपला कार्यभार सांभाळला. तत्पूर्वी आमदार ते राज्यपाल असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळातून शोक व्यक्त होत आहे. तसेच, दिग्गजांकडून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.



सत्यपाल मलिक यांचा प्रवास सपामधून सुरु झाला होता, ते काही काळ भाजपमध्येही कार्यरत होते. मात्र, अनेकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट टीका केल्याने त्यांच्याकडे देशभरातील राजकीय नेत्यांचे लक्ष लागले होते. जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० हटवल्यानंतर मोठी तणावाची स्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी सत्यपाल मलिक जम्मू काश्मीरचे राज्यपाल होते. अशा महत्त्वाच्या क्षणी प्रशासन आणि कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी राज्यपाल म्हणून सत्यपाल मलिक यांच्याकडे होती. सत्यपाल मलिक यांच्याच कार्यकाळात जम्मू काश्मीर आणि लडाख असे भाग करण्यात आले होते. दरम्यान, सत्यपाल मलिक यांना ३ नोव्हेंबर २०१९ ला गोव्याच्या राज्यपालपदाची जबाबदारी देण्यात आली होती. मात्र, पुलवामामध्ये झालेल्या दहशवादी हल्ल्यानंतर मलिक यांनी केंद्रातील मोदी सरकावर गंभीर आरोप केले होते, जवानांना हेलिकॉप्टर देण्याऐवजी बसने पाठविण्यात आल्याचे सांगत त्यांनी सरकारला लक्ष्य केलं होतं. त्यांच्या या आरोपानंतर ते देशभरात चर्चेत आले होते.

## आरती साठे मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश

### हा लोकशाहीवर सर्वात मोठा आघात असल्याची रोहित पवार यांची टीका

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणे म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वात मोठा आघात असल्याची टीका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. दोन वर्षांपूर्वी भाजपच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. यावरून रोहित पवारांनी हल्लाबोल केला आहे.

आमदार रोहित पवारांनी ट्विट करत म्हटले की, याचा भारतीय न्याय व्यवस्थेच्या निःपक्षपणावर दूरगामी परिणाम होईल. केवळ न्यायाधीश होण्याची पात्रता आहे म्हणून थेट राजकीय व्यक्तींना न्यायाधीश म्हणून नेमणे म्हणजे न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? असा सवाल पवारांनी उपस्थित केला. सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये (पान ४ वर)

# यंदाचा साखर हंगाम फायद्याचा

यंदाचा म्हणजे २०२५-२६चा ऊस हंगाम पावसाच्या पातळीवर अनुकूल राहिला. अजून दोन महिने पावसाचे आहेत. दसरा, दिवाळीला ऊस गाळप होऊन साखर उत्पादन सुरू होईल. इथेनॉलसंबंधी केंद्र सरकारने वेळेवर निर्णय घेतले आणि साखर साठ्यांवर नियंत्रण ठेवले, तर सरकारने १०.२५ टक्के रिकव्हरीच्या उसाला ३५५० रुपये एफआरपी जाहीर केला आहे. प्रत्यक्षात १२.५ टक्के उताऱ्याच्या उसाला प्रतिटन सरासरी ३३०० ते ३५०० निव्वळ मिळण्याची शक्यता आहे. मात्र हे सर्व घटक एकाचवेळी योग्य प्रकारे घडले, तरच हंगाम फायदेशीर ठरेल. अन्यथा परिस्थिती अवघड होऊ शकते आणि त्याचे दुष्परिणाम शेतकरी, कामगार आणि कारखान्यांवर उमटू शकतात.

साखर हंगाम २०२५-२६ दरवर्षीप्रमाणेच नव्या आशा, आकडे आणि आव्हानांसह येत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे ग्रामीण, सोलापूर आणि नगर या जिल्ह्यांमध्ये यंदाच्या हंगामात एकूण ५.४ कोटी मेट्रिक टनांवर ऊस गाळपासाठी उपलब्ध असल्याचे साखर आयुक्त कार्यालयाच्या प्राथमिक आकडेवारीतून समोर आले आहे. यासाठी सुमारे २०० ते २२० साखर कारखान्यांची तयारी असून, सुमारे ५४० लाख टनांपर्यंत ऊस गाळप अपेक्षित आहे. यासाठी लागणाऱ्या एकूण उसाची गरज सुमारे ४७०-४८० लाख टनांच्या घरात आहे. याचा अर्थ असा की, साखर हंगामात गाळप क्षमतेपेक्षा थोडा अधिक ऊस उपलब्ध असून, उसाची पळवापळवी किंवा आडमार्गाने ऊस नेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गेल्या वर्षी कोल्हापूर व सांगलीतील काही भागात ही समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून आली होती. गेल्या तीन हंगामांत शेतकऱ्यांना टनामागे निव्वळ किती रक्कम मिळाली, याचा विचार करता २०२२-२३ मध्ये सरासरी २९५०, २०२३-२४ मध्ये ३०५० तर २०२४-२५ मध्ये सरासरी ३१२० रुपये प्रति टन असा टप्प्याटप्प्याने वाढलेला भाव दिसतो. यामध्ये तोडणी व वाहतूक खर्च, उचल विलंब, फड नंबर इ. बाबी गृहीत धरल्यास शेतकऱ्याच्या हाती प्रत्यक्षात मिळालेली रक्कम थोडी कमीच राहते. सांगली जिल्ह्यात यंदा तोडणी वाहतूक खर्च सुमारे ७७० ते ७९० रु. दरम्यान आहे. त्यामुळे एफआरपी रुपये ३५५० असली तरी १२.५ टक्के प्रमाणे वरच्या २.२५ टक्क्याचे ७७८ रु. तोडणी आणि वाहतुकीला गेले तर शेतकऱ्याला मिळणारा निव्वळ भाव सुमारे ३५५० रुपये येतो. मात्र त्यापेक्षा कमी रिकव्हरीला दर कमी असेल. यंदाच्या हंगामात वातावरणाचा जोर काहीसा उशिरा लागल्याने उसाचे वय काही भागात कमी आहे, मात्र पावसाचे एकूण स्वरूप अनुकूल असल्यामुळे रिकवरीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे. पुणे ग्रामीण व सातारा जिल्ह्यांमध्ये उसाची सरासरी रिकवरी १०.८% पेक्षा अधिक असून, सोलापूर व नगरमध्ये ती तुलनेत कमी म्हणजेच ९.९% ते १०.२% दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. या रिकवरी दराच्या आधारावर एफआरपी ठरत असल्यामुळे शेतकऱ्यांना किती भाव मिळेल, हे त्यावर ठरणार आहे.

इथेनॉलचा मुद्दा या हंगामातही केंद्रस्थानी असणार आहे. जर इथेनॉल उत्पादनासाठी पुरेसा ऊस वळवला गेला आणि केंद्र सरकारने इथेनॉल खरेदी दर वेळेवर निश्चित केले, तर कारखान्यांच्या लिक्विडिटी स्थितीत सुधारणा होईल. मात्र याच वेळेस साखरेचा साठा जर जास्त झाला आणि निर्यात धोरण अस्पष्ट राहिले, तर साखरेच्या किमतीवर परिणाम होऊ नये म्हणून इथेनॉलकडे साखर वळवावी लागेल किंवा दर चांगले मिळाले, तर निर्यात होईल.

सध्या साखरेचा दर ३६ ते ३७ रुपये प्रति किलोच्या आसपास असून, काही खासगी व्यापारी दरात घट होण्याची शक्यता वर्तवत आहेत. या पार्श्वभूमीवर कारखानदारीसमोरील मोठी आव्हाने म्हणजे ऊस उचल, वेळ, कामगार उपलब्धता, साखर साठ्याची हाताळणी आणि इथेनॉल प्लांट्सची व्यवहार्यता हे आहे. अनेक लघू व मध्यम कारखान्यांना इंधन दरवाढ, थकीत बिले आणि उत्पादन खर्चामुळे गाळपाची सुरळीतता राखणे कठीण होईल. यामधून काही कारखाने स्पर्धेतून बाहेर पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे म्हणजे गाळप यंत्रणा सुरळीत चालली पाहिजे, ऊस तोडणी वेळेवर झाली पाहिजे आणि साखर कारखान्यांनी एफआरपी पूर्णपणे आणि शक्यतो एकाच हप्त्यात अदा केली पाहिजे. साखर विक्री आणि इथेनॉल उत्पन्नाचा लाभ जर वेळेवर झाला, तर यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी खरोखर फायदेशीर ठरू शकतो.

# सुखावणारा ऋतुगंध

तुझी माझी पहिली भेट म्हणजे मृद्गंधाचे अनमोल दरवळते अत्तर
नाते तुझे नी माझे हृदयस्थ सुंदर बहरत राहते माझ्या मनी निरंतर...

ग्रीष्माच्या धगीत पोळणारी धरित्री, मलूल झालेली हिरवाई, थांबलेला वारा आणि वर तप्त आग ओकणारा सूर्य आणि निरभ्र चकचकीत आकाश... आणि हे सगळे बदलणारा तो जादूई प्रहर येतोच... कुठून कसे कोण जाणे पण भराभर काळ्या मेघांचे सैन्य आभाळात दाखल होते. वीज या मेघांवर आसूड ओढते... जोरात नगारा घुमू लागतो. वारा उन्मादात चहुबाजूंनी सैरावैरा धावू लागतो. झाडांचे नृत्य सुरू होते आणि मग टिपीर तालात टपोर पाण्याच्या थेंबमाळा धरतीला भेटण्यासाठी आवेगाने येतात. मातीला त्यांचा स्पर्श होताच मृद्गंध उधळतो. हा पहिला दरवळ आपले अवघे तनमन वेढणारा असतो. ही वर्षा ऋतूची गंधाळ अवर्णनीय पहिली भेट असते.

मातीच्या सुपीक कुशीत बीज रुजते. हिरवाई चहू बाजूंनी बहरून येते. फुलांचा, धान्याचा (भुईमूग, चवळी, मूग इत्यादी.) ओल्या गवताचा, रान फुलांचाही ओलसर गंध मनात भरून राहतो. वर्षा ऋतूतला सगळ्यात गंधित महिना म्हणजे श्रावण. पारिजातकाच्या सुगंधी दरवळात वेढून राहणारा. केवडा, चाफा, कण्हेर, जास्वंद, कोरंटी, गुलबक्षी, गणेश वेल किती किती रंगांची आणि गंधाची उधळण करणारा हाच ऋतू असतो. कोवळ्या किरणांचा सोनरंग सप्तरंगी इंद्रधनुष्य आपल्याला खिळवून ठेवतो.

याच महिन्यात श्रावण सोमवार. हिरवी बिल्व दले, कापूर, धूप दरवळ प्रसन्नता वाढविणारे, मंगळागौर, श्रावण शुक्रवार, शनिवार, सोमवार अनेक सणांना पुरणाच्या आरत्या आणि साग्रसंगीत नैवेद्याचे ताट यांचा सुवास रसना चेताविणारा असतो.

भाद्रपद महिन्यात गौरी-गणपती, अनेक सुगंधी फुले, दुर्वा, मोदक, पंचखाद्य किती किती तरी दरवळ मन गुंतवून ठेवणारे असतात. अश्विन महिन्यात झेंडू, शेवंती, सूर्यफूल इत्यादी रसरसून फुलतात. धान्याची कणसे डोलू लागतात. नवरात्र, दसरा सगळेच तृप्त सुंदर गंधात भरलेले असतात. पावसाळा हा ऋतू सगळ्यांना सुखावणारा ऋतू आहे. कारण तो धरतीला तृप्त गंधित करतो. आकाशातले, निसर्गातले फळा-फुलांचे, भाज्यांचे अनेक रंग गंध मनाचा ठाव घेतात ते याच ऋतूत. समृद्धीबरोबर समाधान आणि सौंदर्य देतो. हे सगळे लक्षात ठेवून आपण पर्यावरण सांभाळले तर ना तो रुसणार किंवा ना अति बरसणार. छान सलग टपोरे थेंब घेऊन येईल आणि तृप्त करून जाईल. हो नां? शेवटी कोणतेही नाते असो दोन्ही बाजूंनी काळजी घेतली, समजून घेतले तरच ते फुलते.म्हणूनच पावसाला असे सांगावे वाटते.

**ओढ लागावी तुझ्या वेळेवर येण्याची पण पर्यावरणाची**
**काळजी आम्हीं घ्यायला हवी तरच वर्षाऋतू गंधाळत राहील**
**मनभर त्याची विविध तालात बरसेल नित थेंबमाळ नवी**

# भारताचा ‘सुंदर’ विजय



**सिराजने** अटकीन्सनचा ’यॉर्कर’ वर त्रिफळा उडवला आणि ज्या सामन्याला’क्लीफहँगर’ म्हणता येईल असा सामना भारताने केवळ ६ धावानी जिंकून २०२५ मधील इंग्लंडविरुद्धची इंग्लंडमधील मालिका २-२ अशा बरोबरीत सोडवली.

सर्वप्रथम या विजयाचे वर्णन’सुंदर’ असेच करावे लागेल. याचे कारण म्हणजे भारताच्या दुसऱ्या डावात ९ विकेट्स ३५७ धावांवर पडल्या असताना वॉशिंगटन सुंदर याने जो रुद्रावतार धारण करून ४ षटकारांची आतशबाजी केली आणि शेवटच्या विकेटसाठी बहुमूल्य अशा ३९ धावा जोडल्या त्याच या विजयात निर्णायक ठरल्या. वॉशिंगटनच्या या’सुंदर’ प्रतिहल्यामुळे हा ’सुंदर’ विजय साकार झाला असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये. शेवटच्या दिवशी इंग्लंडला याच ३९ धावा महागात पडल्या.

मोहम्मद सिराज हा या सामन्यात ‘सामनावीर’ ठरला. ही जणू परमेश्वराची करणी होती. त्याला दुसऱ्या डावात ०वर पायचित ठरवले गेले तेव्हा त्याच्या बॅट ला चेंडू लागून मग पॅडवर आदळला होता. तो नाबाद होता पण भारताकडे ’डी आर एस’ शिल्लक नसल्याने सिराजला हताशपणे मैदान सोडावे लागले. इंग्लंडच्या दुसऱ्या डावात त्याने हॅरी ब्रूक्सचा झेल सीमारेषेवर व्यवस्थित पकडला होता. पण तेथेच काही सेकंद स्थिर उभे राहण्याऐवजी तो एक पाऊल मागे गेला आणि त्याचा पाय बाउन्डरीलाईनला लागल्यामुळे ब्रूक्सला षटकाराचा ‘बोनस’ मिळाला. सिराज त्या दिवशीचा खलनायक ठरवला गेला. ब्रूक्स यावेळी फक्त १९ धावांवर होता. त्यानंतर जो रूटला साथीला घेऊन ब्रूक्सने जो झंजावात निर्माण केला व शतक ठोकले त्यामुळे सामना फिरला व इंग्लंडच्या पूर्णपणे कह्यात गेला. म्हणजे सामना फिरला त्याला सिराजच कारणीभूत ठरला. शेवटच्या दिवशी धोकादायक स्मिथला स्वस्तात गुंडाळून सिराजने सामना भारताच्या बाजूने झुकवला. शेवटी अटकिंसन्सचा ऑफ स्टंप उखडून सिराजने भारताला सामना जिंकून दिला. थोडक्यात सिराजने शेवटच्या दोन दिवसात ‘मध्यवर्ती भूमिका बजावली त्यामुळे त्याची ‘सामनावीर’ म्हणून निवड होणे हा काव्यगत न्याय झाला.आता सिराज नक्की म्हणत असेल की ‘खलनायक नही, नायक हूं मैं’.

या सामन्यातले चढउतार कमालीचे विस्मयजनक होते. त्यामुळे मैदानातील तसेच मैदानाबाहेरील प्रेक्षकांचा श्वास शेवटपर्यंत रोखला गेला असल्यास नवल नाही. सामन्यात हा ‘सीसॉ’ निर्माण झाला. तो दोन्ही संघांनी सोडलेल्या झेलांमुळे. इंग्लंडने झेल सोडण्याच्या स्पर्धेत बाजी मारली. त्यांनी सामन्यात एकूण ८ झेल सोडून भारताच्या खेळाडूंपेक्षा आपली ‘बटर फिंगर्स’ अधिक निसरडी असल्याचे दाखवून दिले. भारताच्या आकाशदीपने दुसऱ्या डावात ‘रात्रीचा पहारेकरी’ म्हणून भूमिका बजावताना जो खेळ केला (६६ धावा-१२ चौकार) त्यामुळे इंग्लंडच्या गोलंदाजांच्या डोळ्यासमोर भर उन्हात ‘काजवे चमकले’ असतील. जयस्वाल शतक झळकावण्यात पुन्हा एकदा ‘यशस्वी’ ठरला. त्याला ‘यश’ मिळवून देण्यात इंग्लंडच्या क्षेत्ररक्षकांनी अजिबात हातचे काही राखून ठेवले नाही. मालिकेतील पहिल्या कसोटीत ‘स्वैर’ मारा करून इंग्रजाना धावांचे दान केल्याने ‘प्रसिद्ध’ झालेल्या कृष्णाने शेवटच्या कसोटीत ‘कालिया मर्दन’ केल्यासारखी गोलंदाजी करताना बेथेल आणि जोश टंग यांचे त्रिफळे उध्वस्त केले त्यांनी डोळ्याचे पारणे फिटले.

जडेजाचा ‘रवी’ या मालिकेत फार क्वचितच मावळला. १० डावापैकी ५ डावात नाबाद राहताना या पठ्याने पाच अर्धशतके व एक शतक झळकावले आणि कारकिर्दीचे ‘यशोशिखर’ गाठले. द्रविडचा वारसा चालवणारा ‘के.एल.राहुल’ राहुलच्या कीर्तीला साजेसा खेळला आणि त्याने मालिकेत ५०० च्या वर धावा कुटताना दोन शतकेही ठोकली. नायरच्या ‘कारुण्याची’ कहाणी या मालिकेतही मागच्या पानावरून पुढे चालू राहिली. शेवटच्या कसोटीतील मोक्याच्या क्षणी काढलेल्या ५७ धावा याच काय त्या ‘करुण’ कहाणीला लागलेली आनंदाची झालर होती. ‘ऋषभसारखा’ प्रतिस्पर्ध्यावर शिंग रोखून धावून जाणारा जिगरी ‘पंत’ ऐन भरात असतानाच जायबंदी झाला आणि एक रंगलेली मैफल अर्ध्यावरच संपल्याची रुखरुख मनाला लागून राहिली. बूम बूम बुमराहने पाहुण्या कलाकाराची भूमिका बजावताना आपल्या दर्जाची चुणूक दाखवली आणि दोन वेळा एका डावात पाच विकेट्स काढून आपली कीर्ती कायम राखली. ....आणि शेवटी आपला मनाचा गणपती म्हणजेच ४ शतके ठोकत मालिकेत ७५२ धावा कुटणारा, भारतीय क्रिकेटसाठी शुभ संकेत देणारा नूतन कर्णधार शुभमन गिल. काय म्हणावे त्याच्या सभ्य, सुसंकृत व्यक्तिमत्वाला आणि तेवढ्याच ‘सरळ’ बॅटी ला’! शब्द बापुडे’ अशी अवस्था झाली. अंगात वारे शिरलेल्या ‘विराटा’चा हा वारसदार वाऱ्याच्या मंद झुळकेसारखा सुखद वाटत होता. तर क्रिकेटचे ‘अजीर्ण’ झाल्याचे भाव कायम चेहऱ्यावर असलेल्या रोहितपेक्षा धावांची ‘भूक’ असलेला गिल अधिक पचनी पडला.

ही पाच कसोटी सामन्यांची मालिका ही टी २० च्या ‘डी जे’ च्या दणदणाटानें विटलेल्या कानाला सनईच्या मंजुळ स्वरांच्या नादब्रह्मात जणू गुंतवून गेली. पाचही सामान्यांचा निकाल पाचव्या दिवशी लागला. कसोटी क्रिकेटचा पुनर्जन्मच झाला तोही एके काळच्या ’जेते’ आणि ‘जित’ यांच्या मैदानातील द्वनद्वाने हाही एक योगायोगच... आणि हा योग जुळवून आणला तो कात टाकलेल्या नव भारताच्या नव्याने फुटलेल्या पालवीने.

**- रघुनंदन भागवत**

# मंत्रालय प्रवेशासाठी सर्वसामान्यांना आता ‘डीजी’ नोंदणी बंधनकारक

## ऑफलाइन पास देणाऱ्या खिडक्या स्वातंत्र्यदिनापासून बंद

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - कामानिमित्त मंत्रालयात येत असाल तर ‘डीजी ॲप’वर नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे. ‘डीजी ॲप’वर नोंदणी असणाऱ्या अभ्यागतांनाच आता मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे.

कामानिमित्त राज्यभरातील लोक मंत्रालयात धाव घेतात. मंत्रालयात प्रवेश करण्यासाठी अभ्यागतांसह वकील, राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना गार्डन गेटजवळील खिडकीवर ऑफलाइन पास काढणे बंधनकारक आहे. मंत्रालयात प्रवेश करण्यासाठी गार्डन गेट जवळ ऑफलाइन पाससाठी ९ खिडक्या, तर नवीन प्रशासकीय इमारतीत १ खिडकी अशा एकूण १० खिडक्यांवर ऑफलाइन पास उपलब्ध होतो. मात्र मंत्रालयाच्या सुरक्षेच्या दृष्टीने १५ ऑगस्टपासून खिडक्यांवर ऑफलाइन पास देणे बंद करण्यात येणार आहे.



मंत्रालयात येणाऱ्या व्हीव्हीआयपींची सुरक्षा व गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मार्च २०२५ मध्ये फेस डिटेक्शन व ‘डीजी ॲप’ प्रणाली अमलात आणली आहे. त्यामुळे आता ऑफलाइन पास पद्धत बंद करण्यात येणार असून अभ्यागतांना आता ‘डीजी ॲप’ वरच मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे, असे गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम यांनी सांगितले. कामानिमित्त मंत्रालयात येणाऱ्यांची गर्दी लक्षात घेता गर्दीवर नियंत्रण मिळिवण्यासाठी राज्य शासनाने फेस डिटेक्शन व डीजी प्रवेश ॲप प्रणाली अमलात आणली. या दोन्ही प्रणालीमुळे मंत्रालयातील गर्दीवर नियंत्रण मिळवणे शक्य होणार असल्याचे निकम यांनी सांगितले.

असा डाऊनलोड करा ‘डीजी ॲप’ : डीजी प्रवेश ॲप हे मोबाइल ॲप ॲण्ड्राईड आणि आयओएस ॲप या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाइलच्या प्रणालीनुसार अँड्राईडमध्ये प्ले स्टोअरवर, तर आयओएस ॲपल स्टोअरवर डीजी प्रवेश (digi Pravesh) हे सर्च केल्यास हे ॲप विनामूल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरुवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारित यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे, त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश मिळतो.

# श्री प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी मानवत, सेलू, परतूर, रोटेगाव आणि नगरसोल स्थानकावरील अमृत भारत स्टेशनच्या कार्याची प्रगती तपासली



नांदेड, दि. ५ (प्रतिनिधी) - नांदेड विभागातील दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) श्री प्रदीप कामले यांनी आज परभणी ते नगरसोल सेक्शन ची विस्तृत तपासणी केली आणि प्रमुख विकासात्मक आणि सुरक्षिततेच्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

तपासणीदरम्यान, श्री कामले यांनी मानवत, सेलू, परतूर, रोटेगाव आणि नगरसोल स्थानकांना भेट दिली, जिथे त्यांनी जागतिक दर्जाच्या सुविधा प्रदान करण्याच्या आणि प्रवाशांना सुधारित अनुभव देण्याच्या उद्देशाने अमृत भारत स्टेशन (एबीएस) योजनेअंतर्गत स्थानकांवर सुरु असलेल्या कार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. पुढे, डीआरएम साहेबांनी सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी प्रस्तावित रोड अंडर ब्रिज (आरयूबी) कामांसाठी विविध लेव्हल क्रॉसिंगची तपासणी केली, यात -

बदनापूर-करमाड दरम्यान किमी १५१/४-५ वर लेव्हल क्रॉसिंग क्र. ६८ ची पाहणी.

दौलाताबाद-पोटुल दरम्यान किमी ९७/२-३ वर लेव्हल क्रॉसिंग क्र. ४२ ची पाहणी.

दौलाताबाद-पोटुल दरम्यान किमी ९६/०-९५/९ वर लेव्हल क्रॉसिंग क्र. ४१ ची पाहणी.

परसोडा-रोटेगाव दरम्यान किमी ६३/४-५ वर लेव्हल क्रॉसिंग क्र. २७ च्या जागी प्रस्तावित भुयारी पुलाची (रोड अंडर ब्रिज) पाहणी केली .

तारूर-नगरसोल दरम्यान किमी ३७/६-७ वर लेव्हल क्रॉसिंग क्र. १६ च्या बदल्यात प्रस्तावित रोड भुयारी पुलाची (रोड अंडर ब्रिज) पाहणी केली. श्री प्रदीप कामले यांनी सांगितले की अमृत भारत स्टेशन योजना प्रवाशांच्या सुविधा आणि स्टेशन पायाभूत सुविधांमध्ये बदल घडवून आणेल, तर भुयारी पुलाच्या (रोड अंडर ब्रिज) कामांमुळे सुरक्षितता वाढेल, लेव्हल क्रॉसिंगवरील अपघाताचे धोके कमी होतील आणि रेल्वेचे काम काज सुरळीत होईल.

या दौऱ्यादरम्यान श्री प्रदीप कामले यांनी परभणी ते नागरसोल मार्गावर मागील खिडकीतून तपासणी (Rear Window Inspection) केली, ज्यात त्यांनी रेल्वे पटरी, रेल्वे सिग्नल्स, रेल्वे लेव्हल क्रॉसिंग्स आणि विविध संरक्षक यंत्रणांची पाहणी केली. हे सर्व उपक्रम विभागीय रेल्वे सुरक्षेचा दर्जा वाढवण्यासाठी आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यांनी अधिकाऱ्यांना सर्व कामे दर्जेदार आणि वेळेवर पूर्ण करण्याचे निर्देश दिले. अभियांत्रिकी, वाणिज्य, बांधकाम/गति शक्ती, सिग्नल आणि टेलिकॉम, इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल विभागातील वरिष्ठ अधिकारी तपासणी दरम्यान डीआरएम साहेबांसोबत उपस्थित होते.

# म्हाडातर्फे सदनिकांसाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन; २६ सप्टेंबर रोजी लॉटरीची सोडत

## मुख्य अधिकारी दत्तात्रय नवले यांची माहिती

छत्रपती संभाजीनगर, दि. ५, (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे सोडत जुन-२०२५ अन्वये १३४१ निवासी सदनिका भुखंड व नाशिक मंडळातील ६७ सदनिका असे १४०८ सदनिका भुखंडाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्जदारांना ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अनामत रकमेचा भरणा करून ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. प्राप्त होणाऱ्या अर्जांची २६ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सोडत काढण्यात येणार आहे, अशी माहिती छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी दत्तात्रय नवले यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी कार्यकारी अभियंता नितीन शिंदे, उपमुख्य अधिकारी श्री. जयकुमार नामेवार उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे सोडत जुन-२०२५ अन्वये १३४१ निवासी सदनिका भुखंड व नाशिक मंडळातील ६७ सदनिका असे १४०८ सदनिका भुखंडाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या सोडतीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १०५६ सदनिका अत्यल्प उत्पन्न गट नक्षत्रवाडी छत्रपती संभाजीनगर व २४४ पैकी ९२ सदनिका अत्यल्प उत्पन्न गट अंबाजोगाई जि.बीड या योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या योजनेसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत रु.२.५०/-लक्ष इतके अनुदान अर्जदारांना प्राप्त होणार आहे. त्यामुळे रु.१०.००/-लक्ष ते रु.१२.५०/- लक्ष या किंमतीत १ बीएचके सदनिका घेण्याची सुवर्णसंधी प्राप्त झालेली आहे. अर्जदारांना अंदाजित डिसेंबर-२०२६ पर्यंत या सदनिकांचा ताबा मिळणार आहे.




छत्रपती संभाजीनगर शहराच्या अत्यंत मोक्याचे ठिकाण असलेल्या चिकलठाणा येथे म्हाडा योजनेअंतर्गत १५४ सदनिकांचा सोडतीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. ही योजना जालना रोड पासून हाकेच्या अंतरावर असल्यामुळे रु.२७.००/- लक्ष ते रु.३४.००/- लक्ष या परवडणाऱ्या किंमतीत अर्जदारांना २ बीचके सदनिका घेता येणार आहेत. या योजनाचा ताबा अर्जदारांना डिसेंबर-२०२५ पर्यंत देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत विविध योजनेतील बीड बायपासलगत सातारा परिसर व देवळाई येथील २१ सदनिका व १८ निवासी भुखंडाचा समावेश करण्यात आलेला आहे. अर्जदारांना रु.१५.००/- लक्ष या किंमतीत सदनिका तसेच रु.५.००/- लक्ष या किमतीत भुखंड घेण्याची संधी उपलब्ध आहे.

या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्जदारांना ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री. ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अनामत रक्कमेचा भरणा करुन ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जाची दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सोडत काढण्यात येणार आहे.

अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता https://housing.mhada.gov.in किंवा https://www.mhada.gov.BZ या संकेतस्थळास भेट द्यावी. या सोडतीकरिता मंडळातर्फे हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आलेले असून अर्ज नोंदणीकरिता - ०२२-६९४६८१००. ऑनलाईन पेमेंट करिता-१८००८९१८२९७,७०६६०४७२१२, suort@easebuzz.in यावर संपर्क साधता येणार आहे. या सोडतीकरिता मंडळाने आपल्या विभागीय कार्यालयात तळमजल्यावर विशेष मदत कक्ष स्थापन केला आहे.

मंडळातर्फे मराठवाडयाच्या विविध जिल्ह्यातील ५२ अनिवासी भुखंड ज्यामध्ये सुविधा भुखंड, रहिवासी भुखंड, सोयीचे दुकाने समावेश करुन जुन-२०२५ ई-ऑक्शन (ई-लिलाव) जाहिर करण्यात आला होता. त्यानुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक ०१/०८/२०२५ रोजीपर्यंत ११५ अर्जदारांनी अनामत रक्कम भरुन या ई-ऑक्शन मध्ये सहभाग घेतलेला आहे. लवकरच ऑनलाईन पध्दतीने हा लिलाव काढण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# मिटमिटा येथील श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिरात पावित्र श्रावण मास निमित्ताने श्री शिवलीलामृत सामूहिक पारायणाला प्रारंभ





मिटमिटा येथील श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिरात पावित्र श्रावण मास निमित्ताने श्री शिवलीलामृत सामूहिक पारायणाला आज पासून प्रारंभ झाला . यात ४० शिष्य, महिला भक्तांचा सहभाग होता. शिवाच्या ‘ओम नम:शिवाय’ या मंत्राच्या १०८ वेळा सामूहिक जपाने पारायणाला प्रारंभ झाला. महामृत्युंजय मंत्राचे उच्चारण करत भगवान शिवाला बिल्वार्चन करण्यात आले. भक्तांचा आणि शिष्यांचा विशेषत: महिलांमध्ये उत्साह ओसंडून वाहत होता.

## माधुरी हत्तीणीला नांदणी मठात परत आणण्यासाठी राज्य सरकार सुप्रीम कोर्टात पुनर्विचार याचिका दाखल करणार

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) – कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळा तालुक्यातील नांदणी मठातील माधुरी हत्तीण पुन्हा नांदणीत यावी, अशी जन भावना आहे. ही जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. राज्य सरकारही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयात हत्तीणीला परत देण्यासंदर्भात भूमिका मांडेल. याप्रकरणी राज्य सरकार पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नांदणी मठातील माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीच्या प्रश्नासंदर्भात मंगळवारी मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी मठाचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



नांदणी मठाच्या परंपरा आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा विचार करून कायदेशीर प्रक्रिया मार्गाने माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीला पुन्हा मठात परत आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. गेल्या ३४ वर्षापासून माधुरी हत्तीण नांदणी मठात आहे. माधुरी पुन्हा मठात यावी ही जनभावना आहे.

ही जनभावना लक्षात घेऊन राज्य सरकार पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य सरकारचाही समावेश करावा, असे फडणवीस म्हणाले.

वन विभागाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल. यामध्ये केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या निकषाप्रमाणे व उच्चस्तरीय समितीने सुचविलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यात येईल.

हत्तीणीची निगा राखण्यासाठी डॉक्टरसह राज्य शासन एक पथक तयार करून आवश्यक ती सर्व मदत करेल. आवश्यक वाटल्यास रेस्क्यू सेंटरसारखी व्यवस्थाही करण्यात येईल व त्याप्रमाणे सुविधा देण्यात येतील आदी बाबींचा समावेश करून या बाबी तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयास स्वतंत्र समिती नेमण्याची विनंतीही राज्य शासनामार्फत या याचिकेमध्ये करण्यात येईल. या प्रकरणात नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही असेही फडणवीसांनी सांगितले. महाराष्ट्रातील जे हत्ती बाहेर नेण्यात आले, अशा सर्व हत्तींची माहिती वन विभागाने गोळा करावी, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन माधुरी हत्तीणीला परत आणण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी भूमिका मांडली. यावेळी खासदार धैर्यशील माने, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, विश्वजीत कदम, सतेज पाटील, अशोक माने, सदाभाऊ खोत, राहुल आवाडे, अमल महाडिक, माजी खासदार राजू शेट्टी, माजी आमदार प्रकाश आवाडे, नांदणी मठाचे पूज्य स्वस्तीश्री जिनसेन महास्वामीजी, जैन अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) श्रीनिवास राव, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे आदीसह जैन स्वामी व स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगरचा गुरु भक्तानी घेतल साध्वी काचनकवरजी म. सा याचे दर्शन




छत्रपती सभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – प पु काचनकवरजी म.सा. याचा २०२५ चातुर्मास बेगलोर येथे सुरु असून चातुर्मासासाठी उपस्थित असलेल्या गुरु भक्ताना साध्वी म्हणाल्या की, जैन धर्मात, जिनशानमध्ये, शिष्य आणि भक्तांसाठी आत्मकल्याणाची उत्सुकता खरोखरच महत्त्वाची आहे. आज लोक आज्ञांचे पालन करण्याचा प्रयत्न करत नाहीत. जे काम करायला हवे आहे त्याबद्दल ते बेफिकीर आहेत आणि जे काम करायला नको आहे ते उत्साहाने करतात. तीर्थंकर भगवानांनी दिलेला आदेश पूर्णपणे पाळला पाहिजे.

तक्रारी केल्याने ते अहंकाराने भरलेले आणि पुढे जाण्यास असमर्थ होतात. दुसरीकडे, तक्रार केल्याने माणूस दुःखी आणि निष्क्रिय होतो. जर तुम्हाला जीवनात यश हवे असेल तर तक्रार करणे थांबवा. सांगितले की,यावेळी छत्रपती सभाजीनगरचे जैन कान्फ्रेंस पदाधिकारी ची गुरू दर्शन यात्रामध्ये ऑल इंडिया स्थानकवासी जैन कान्फ्रेंस चे पदाधिकारी मंडल नुकतेच विविध ठिकाणी गुरू दर्शन व चातुर्मास शुभेच्छा देण्यासाठी गेलेत जयनगर बैंगलौर येथे चातुर्मासार्थ विराजमान असलेल्या अरिहंत आराधिका उपप्रवर्तनी परम पूज्य श्री कंचनकवरजी म सा यांच्या दर्शनार्थ पदाधिकारी मंडल आले असता संघाच्या वतीने त्यांच्या विषेश सम्मान व देव गुरु धर्म सेवेचा गौरव करण्यात आला अहमदनगर येथील सतीश लोढा महामत्री मिठालाल कांकरिया, तनसुख झांबड, मदनलाल लोढा सहमत्री दिलीप मुगदिया हजर होत यावेळी स्वागत संघाचे अध्यक्ष दीपचंद भन्साळी व बोहरा यांनी अतीथीचे स्वागत केले. साध्वी कांचन कंवर म. सा यांनी मंगल पाठाचे पठण केले.

## युद्ध, जिद आणि बलिदानाची कहाणी: एक्सेल एंटरटेन्मेंट आणि ट्रिगर हॅपी स्टुडिओज प्रस्तुत ‘१२० बहादुर’ चा दमदार टीझर प्रदर्शित – फरहान अख्तरची जबरदस्त झलक!

पोस्टरच्या थरारक अनावरणानंतर अवघ्या एका दिवसात, एक्सेल एंटरटेन्मेंट आणि ट्रिगर हॅपी स्टुडिओजने आपल्या बहुप्रतिक्षित चित्रपट ‘१२० बहादुर’ चा टीझर प्रदर्शित केला आहे. हा टीझर प्रेक्षकांच्या मनात देशभक्तीची नवी ऊर्जा जागवणारा असून, त्यात युद्धातील शौर्य, भावना आणि आत्मबलिदान यांचा जबरदस्त संगम पाहायला मिळतो.




या टीझरमध्ये फरहान अख्तर मेजर शैतान सिंह भाटी (पी.व्ही.सी.) यांच्या प्रभावी भूमिकेत दिसत असून, त्यांच्या नव्या रुपाने प्रेक्षकांना वेगळा अनुभव मिळतो. पहिल्याच झलकितून हे स्पष्ट होते की हा चित्रपट भारताच्या इतिहासातील एक अभिमानास्पद पान पुन्हा जिवंत करणार आहे.

चित्रपट १९६२ मधील रेझांग ला येथील खऱ्या युद्धावर आधारित आहे, जिथे फक्त १२० भारतीय जवानांनी हजारो शत्रूंचा मुकाबला करत इतिहास रचला. टीझरमध्ये सतत ऐकू येणारी एक प्रभावी ओळ, ‘आम्ही मागे हटणार नाही!’ ही चित्रपटाच्या मूळ आत्म्याचे दर्शन घडवते. फरहान अख्तरचा गंभीर, समंजस आणि हृदयस्पर्शी अभिनय मेजर शैतान सिंह यांच्या रूपात विशेष लक्षवेधी ठरत आहे. त्यांच्या अभिनयातील शांत ताकद आणि वास्तवदर्शी शैलीला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून भरभरून दाद मिळत आहे.

लडाख, राजस्थान आणि मुंबई येथे चित्रित करण्यात आलेला हा चित्रपट युद्धभूमीची थरारक अनुभूती देतो. बर्फाच्छादित प्रदेशांपासून रणभूमीच्या शांततेपर्यंत प्रत्येक फ्रेममध्ये सखोलता आणि वास्तवदर्शिता आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन राजनीश ‘रेझी’ घोष यांनी केले असून, रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर (एक्सेल एंटरटेन्मेंट) तसेच अमित चंद्रा (ट्रिगर हॅपी स्टुडिओज) यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. ‘१२० बहादुर’ २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सर्वत्र चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## अनंत काळाची उदासीनता-सीन घालविण्याची क्षमता फक्त संत दर्शनात आहे – हभप रामराव महाराज ढोक

वैजापूर, दि. ५ (प्रतिनिधी) – व्यक्ती जीवनातील अनंत काळाचा सीन व उदासीनता घालविण्याची क्षमता फक्त संत दर्शनात आहे, म्हणून संतांचे दर्शन करणारे आपले जीवन धन्य!धन्य!! करतात असे अमृत तुल्य वचन रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक यांनी मंगळवार(ता,०५) रोजी तालुक्यातील तलवाडा गावात सुरू असलेल्या श्री संत बहिणाबाई महाराज यांच्या नामे ४६व्या फिरती नारळी अखंड हरिनाम सप्ताहात केले, ते पुढे म्हणाले की, ईश्वरकृपा झाल्यावरच संत भेटत असतात.


या साठी ब्रह्मलिन झालेल्या संतांच्या नावे जे सप्ताह दरवर्षी आयोजित केल्या जातात ती काळाची गरज आहे. या सप्ताह मुळेच भारतीय समाजात नैतिकता, सामाजिक व नैतिक मूल्ये टिकून आहेत, असे ही ढोक महाराज पुढे म्हणाले.



तालुक्यातील शिवूर येथील श्री संत बहिणाबाई महाराज संस्थांचा हा ४६ वा अखंड हरिनाम सप्ताह तलवाडा येथे या वर्षी सम्पन्न होत आहे. तलवाडा ग्राम पंचक्रोशीतील भक्त भाविकांनी या सप्ताहाचे नारळ घेतले होते. मंगळवार रोजी या सप्ताह स्थळी माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशी, संजय पा. निकम,जेष्ठ समाज कार्यकर्ते ठा. धोंडीरामसिंह राजपूत, महाराष्ट्र नारायणी सेनेचे प्रदेशाध्यक्ष सेवानिवृत्त तलाठी अशोक आप्पा पवार खंडाळकर, कैलास पवार यांची उपस्थिती होती. या सर्वांनी हभप ढोक महाराज यांचे पूजन केले. अशोक पवार व धोंडीराम सिंह राजपूत यांनी ढोक महाराज यांना सन्मान पत्र देऊन सन्मानित केले. या सप्ताहात मोठ्या प्रमाणात भक्त भाविकांनी गर्दी केली होती. महाराजांच्या कीर्तनानंतर उपस्थित सर्व भक्त भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. तलवाडा येथील व पंचक्रोशीतील गावकरी, शिक्षक, सेवेकरी परिश्रम घेत आहेत.

## विष्णु नगर, जैन मंदिरात नवीन वेदी प्रतिष्ठा व प्रतिमा स्थापना महोत्सव आयोजन

छत्रपती सभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – श्री. १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर विष्णु नगर, छ. भाजी नगर, येथे नवीन वेदी प्रतिष्ठा व प्रतिमा स्थापना महोत्सव आयोजन ६, ७ ऑगस्ट रोजी केले असुन मंगलवार, दि. ६ ऑगस्ट सकाळी: ७ वाजता : मिरवणूक शोभायात्रा व मंदीर द्वार उद्घाटन ध्वजारोहण व मंडप शुद्धीकरण भगवंत अभिषेक, सकलीकरण, इंद्र प्रतिष्ठा विधान, आरती, शास्त्र वाचन व धर्मप्रभावना कार्यक्रम होनार आहे तसेच बुधवार, दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता अभिषेक वास्तुविधान, वेदी शुद्धी, संस्कार व प्रतिमा स्थापना हवन व विसर्जन होणार आहे. यावेळी दुपारी २:०० वाजता – महाप्रसाद सिंधी भवन, सिंधी कॉलनी, होणार आहे.



या महोत्सव साठी प्रतिष्ठाचार्य संदीपजी जैन दौंड हे लाभले आहे साग्रसंगीतामध्ये रूपाली रावका पारंपरिक जैन संगीत व भजन संध्या होनार आहे तरी समाज बाधवानी वरील धार्मिक कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन श्री. १००८ चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदीर ट्रस्ट मंडल प्रतिष्ठा आयोजन समिती व जैन समाज परिवार केले आहे.

## युनायटेड वेस्टर्न बँक निवृत्त कर्मचारी संघटनेचे अधिवेशन सोलापूर येथे संपन्न

सोलापूर, दि. ५ (प्रतिनिधी) – युनायटेड वेस्टर्न बँक व आयडीबीआय बँक सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे २८ वे वार्षिक अधिवेशन सोलापूर येथे तीन ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडले.

सभेच्या पहिल्या सत्रा चे उद्घाटन सोलापूर येथील दाते पंचांग करते श्री मोहनराव दाते यांच्या हस्ते झाले. यावेळी भारतीय मजदूर संघाचे विराज टिकेकर, वरिष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री रवी रमण, संघटनेचे अध्यक्ष अनंत कुलकर्णी, जनरल सेक्रेटरी सुधाकर चौधरी, उपस्थित होते.




दीप प्रज्वलन आणि पाहुण्यांच्या सत्काराने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पंचांगकर्ते दाते यांनी आपल्या भाषणात समाजात पारंपारिक चालत आलेल्या रुढींचा व गैर समजुतींचा सविस्तर आढावा घेऊन कालानुरूप त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आणि या बदलाला शास्त्रीय आधार यावर भाष्य केले. दाते पंचांग यासाठी काय प्रयत्न करीत आहेत याचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला.

सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली. युनायटेड वेस्टर्न बँकेशी असलेल्या दाते पंचांगाचा संबंधांचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

भारतीय मजदूर संघाचे को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे केंद्रीय सहप्रभारी विराज टिकेकर आणि रवी रमण यांनी सभासदांच्या निलंबित प्रश्न, पेन्शन अपडेशन, सेकंड पेन्शन ऑप्शन, याबद्दल भारतीय मजूर संघ करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षीय समारोपात अनंत कुलकर्णी यांनी युनायटेड वेस्टर्न बँकेतून आयडीबीआय बँकेत गेलेल्या कर्मचारी वर्गाचे प्रश्न सोडवावेत असे भारतीय मजदूर संघाला आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनरल सेक्रेटरी सुधाकर चौधरी यांनी केले. गुरुराज देशपांडे यांनी आभार प्रदर्शन आणि सूत्रसंचालन श्री चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी केले. दुपारच्या सत्रात, निधन पावलेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहून सत्राची सुरुवात करण्यात आली. ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत. अशा सभासदांना संघटनेतर्फे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि चांदीचे स्मृती चिन्ह, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

संघटनेच्या वार्षिक अहवालास सभासदांनी मान्यता दिली अन्य ठराव पास करण्यात आले. या अधिवेशनास संपूर्ण भारतातून ४०० सदस्य आणि रिजनल सेक्रेटरी उपस्थित होते. निवृत्त संघटनेचे माजी पदाधिकारी, नोबो आणि कर्मचारी संघाचे माजी पदाधिकारी हे सर्व अधिवेशनास आवर्जून उपस्थित होते.

सोलापूर येथील रिजनल सेक्रेटरी डी एल कुलकर्णी आणि त्यांची टीम यांनी अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## विधवा पेन्शन योजनेची रक्कम ५००० रुपये करा –आदिती तटकरे

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) – राज्यातील असंख्य दिन दुबळ्या महिलांसाठी जगण्यासाठी आधारस्तभ असलेल्या विधवा महिला पेन्शन योजनाच्या वार्षिक उत्तपन्नाच्या मर्यादेत वाढ करण्यात यावी तसेच मासिक पेन्शनची रक्कम रुपये १,५०० वरून रुपये ५,००० करण्यात यावी अशी मागणी, मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी पत्राद्वारे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सचिव यांच्याकडे केली आहे.

हि योजना महिला व बालविकास विभागामार्फत महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. हि योजना राज्यातील दिन दुबळ्या महिलांसाठी जगण्याचा एकमेव आशेचा किरण आहे. परंतु अनेक महिलांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. याचे कारण तहसीलदार यांच्याकडून त्या महिलांच्या परिवाराचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला हा रुपये २१,००० इतका लागत आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत २१,००० म्हणजे मार्सिक १,७५० वेतन हे सामन्यातील सामान्य परिवार इतक्या वेतनामध्ये परिवाराचे पालन पोषण करून शकत नाही, मुंबई मध्ये एखादी सामान्य घरकाम करणारी महिला ही मासिक ८,००० ते १०,००० इतके वेतन मिळवते. त्यामुळे सदर वार्षिक उत्पन्न २१,००० च्या नियमावलीत बदल करून वार्षिक वेतन १,००,००० च्या आत करणे आवश्यक आहे. जेणेकरून विधवा महिलांना त्याचा लाभ घेता येईल.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ‘एआय’ तंत्रज्ञानाशी करा मैत्री; जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशिक्षणात ‘एआय’चे धडे






छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय या तंत्रज्ञानाशी मैत्री करा. ही मैत्री नक्कीच आपल्या फायद्याची आहे. यामुळे आपले श्रम,वेळ वाचून आपल्या कामात अचूकता आणता येते,असे प्रतिपादन विनायक कदम यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सप्ताहानिमित्त ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणिसुयोग्य माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासनातील वापर’, या विषयावर प्रशिक्षण पार पडले. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे पुणे व उत्तर महाराष्ट्र विभागाचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी या प्रशिक्षणात जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, नीलम बाफना तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना एआय तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याविषयी आवाहन केले. हे तंत्रज्ञान आता आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे. त्याचा अंगिकार करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठीच या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा सर्व कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा.

विनायक कदम यांनी एआयच्या विविध उपयोगी ॲप विषयी आपल्या सादरीकरणात माहिती दिली. एआय प्रणालीचा इतिहास समजावून सांगितला. तसेच त्याच्या विविध ॲप विषयी प्रात्यक्षिक दाखवून माहिती दिली. एआय हा अत्यंत विश्वासू मित्र असून त्यास योग्य त्या पद्धतीने सुचना देता यायला हव्या. ते तंत्र शिकायला हवे. जिवनाच्या विविध क्षेत्रात एआय चा वापर होत आहे. एआय आपल्या दैनंदिन जीवनात खूप ठिकाणी उपयोगी ठरत आहे. आपल्या कळत न कळत उपयोग होत आहे. प्रशासनात एआय चा वापर केल्यास अधिकाधिक लोकाभिमुख प्रशासन राबविता येईल,असेही त्यांनी सांगितले.

# महावितरणचे वीज बिल डाऊनलोड करण्यासाठी आता ‘लॉगिन’ अनिवार्य

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे.

महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावरील ‘वीजदेयक अवलोकन/भरणा’ पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाइन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमीट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती.

आता नव्या बदलात वीज बिल लॉगिनशिवाय ऑनलाइन भरण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. मात्र पीडीएफ वीजबिल डाऊनलोड करण्यासाठी नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य आहे. लॉगिनची लिंकदेखील ‘वीजदेयक अवलोकन/भरणा’ पेजवर उपलब्ध आहे. तसेच ज्या ग्राहकांनी आतापर्यंत लॉगिनसाठी नोंदणी केलेली नाही त्यांनी ग्राहक क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल (असल्यास) माहिती भरून नोंदणी करणे तसेच प्रवेश नाम (लॉगिन आयडी) व पासवर्ड (परवली शब्द) निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील लिंक त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) केल्यानंतर स्वतःच्या एकापेक्षा अधिक वीजजोडण्यांसाठी विविध ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी लॉगिन केल्यानंतर १२ अंकी ग्राहक क्रमांक लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही. तसेच वीज बिलावरील नाव, वीज भार बदलणे, तक्रार करणे किंवा तक्रारीची सद्यस्थिती पाहणे, वीज बिलांचा भरणा, पत्ता बदलणे व इतर सर्व ऑनलाइन सेवांचा वीज ग्राहकांना लाभ घेता येईल.

# जालन्यात वीजचोरी करणारे २४ जण पकडले, तिघांवर गुन्हा दाखल

जालना दि.५ (प्रतिनिधी)- महावितरणतर्फे अत्याधुनिक असे टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर बसवले जात असल्याने ग्राहकांना त्यांच्या वीजवापराची माहिती दर तासानुसार (रिअल टाइम) उपलब्ध होत आहे. त्यामुळे ग्राहकांचे वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण राहील. तसेच या मीटरमध्ये ग्राहकाने फेरफार केल्यास त्याची माहिती थेट महावितरणला ऑनलाइन कळत आहे. टीओडी मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी केल्याची २४ प्रकरणे जालन्यात नुकतीच उघडकीस आली आहेत. तीन ग्राहकांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, इतर ग्राहकांवरही गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे वीजचोरांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

राज्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच जालना जिल्ह्यातही सध्या नवीन वीज जोडणी व सौरऊर्जा ग्राहकांसाठी टीओडी मीटर बसवण्यात येत आहेत. तसेच जुने मीटर बदलून त्याजागीही टीओडी मीटर बसवले जात आहेत. टीओडी मीटरमध्ये कम्युनिकेशन पोर्ट असून ते महावितरणच्या सर्व्हरला जोडलेले असल्याने मीटरचा रिअल टाइम डाटा उपलब्ध होतो. मीटर नादुरुस्त झाल्याची माहिती त्वरित मिळते. या मीटरचे रीडिंग ऑटोमॅटिक होणार आहे. यात मानवी हस्तक्षेपाला कोणताही वाव नाही. त्यामुळे ग्राहकांना अचूक व वेळेवर बिले मिळणार आहेत.

वीजवापराबरोबरच मीटरमध्ये कुणी फेरफार केला तर त्याची थेट माहिती त्याच क्षणी महावितरणला मिळत आहे. अशा ग्राहकांची प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतर वीजचोरी पकडली जात आहे. जालना शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात महावितरणने गेल्या काही दिवसांत केलेल्या तपासणीत टीओडी मीटरमध्ये वीजचोरी केल्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत. या ग्राहकांना काही महिन्यांपूर्वी टीओडी मीटर बसवण्यात आले होते. पण त्यांनी मीटरमध्ये काहीतरी फेरफार केल्याची माहिती महावितरणला लगेच ऑनलाइन उपलब्ध झाली. या ग्राहकांनी वीजचोरी केल्याचे प्रत्यक्ष तपासणीत आढळून आले. या सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तसेच त्यांच्यावर विद्युत कायद्याच्या विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी तिघांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले. इतर ग्राहकांवरही गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. महावितरणच्या या कारवाईने वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.

हे अत्याधुनिक मीटर असल्याने प्रत्येक युनिटची रिअल टाइम माहिती ग्राहकास मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वीज वापरानुसार रीडिंग येते याची खात्री ग्राहकाला करता येणार आहे. मीटरसाठी ग्राहकांवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. ही केंद्र सरकारची योजना असल्याने मीटर बसवण्यासाठी केंद्राने निधी दिला आहे. तसेच घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेतील वीज वापरास सवलतही मिळणार आहे.

तथापि, टीओडी मीटरचे इतके सारे फायदे असतानाही काही ग्राहक वीजचोरी करताना आढळले आहेत. अत्याधुनिक प्रणालीमुळे मीटरमधील फेरफार महावितरणला तत्काळ माहीत होत आहे. वीजचोरी हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून या गुन्ह्यात तीन वर्षे कारावास किंवा दंड अथवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. नागरिकांनी ही बाब लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारे विजेचा चोरटा किंवा अनधिकृत वापर कटाक्षाने टाळावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी जनजागृती, प्रशिक्षण आणि तपासणी प्रभावीपणे राबवा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात दर हजार मुलांमागे ९२७ मुली असे प्रमाण आहे. मुलींच्या जन्मदरात गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढ झाली असली तरी ही वाढ समाधानकारक नाही. यासंदर्भात कायद्याच्या आधारे अपप्रवृत्तींवर कारवाई करणे व मुलींच्या जन्माबाबत समाजाची मानसिकता, दृष्टिकोन बदलवणे या गोष्टीवर भर देणे आवश्यक आहे. तरी जनजागृती. प्रशिक्षण आणि तपासणी प्रभावीपणे राबवाव्या,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. तसेच रुग्ण कल्याण समितीसाठी जिल्ह्यातील दानशूर व्यक्तिंनी निधीचे योगदान द्यावे,असे आवाहनही केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य विभागाशी संबंधित जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, रुग्ण कल्याण समिती, गर्भलिंगनिदान प्रतिबंधक समिती, सुमन जिल्हास्तरीय समिती अशा विविध विषयांवर आधारीत बैठक घेण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत बढे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे, ॲड. रश्मी शिंदे, डॉ. प्रज्ञा सोनवणे तसेच अन्य वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा रुग्णालय अंतर्गत दि.१२ ऑगस्ट ते १२ ऑक्टोबर दरम्यान जनजागृतीसाठी आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त बाईक रॅली, १५० गावात जनजागृती, ६५० माध्यमिक शाळेत एच.आय.व्ही./ एड्स जनजागृती, ९५ महाविद्यालयीन युवक युवती यांना जनजागृती अंतर्गत मार्गदर्शन करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, रुग्ण कल्याण समितीमार्फत रुग्णांसाठी विविध सोई सुविधा राबविल्या जातात. त्यासाठी सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी सढळ हाताने मदत करावी. जिल्ह्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी जनजागृती करुन लोकांचे प्रबोधन करावे. ज्या भागात जन्मदर कमी आहे त्या भागात लक्ष केंद्रीत करावे. कारणांचा शोध घ्यावा. अधिक कडक तपासणी करुन अपप्रवृत्तींवर कारवाया कराव्या. जिल्ह्यात सुरक्षित मातृत्वासाठी सुद्धा जनजागृती करावी. माता व बालकांचे आरोग्य चांगले कसे राहिल याबाबत प्रयत्न करावे,असे निर्देश त्यांनी दिले.

# नारेगाव येथील भवानी चौक ते कचरा डेपो पर्यंत ८१ बांधकामे निष्कासित

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- आज दिनांक ०५ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार, पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी उपलब्ध करून दिलेल्या पोलीस अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी अतिक्रमण विभाग संतोष वाहुळे यांच्या उपस्थितीत नारेगाव येथील भवानी चौक ते कचरा डेपो पर्यंत केलेल्या कारवाईत एकूण ८१ एवढी उर्वरित पक्की आणि कच्ची बांधकामे ज्यामध्ये हॉटेल, दुकाने, शेड,कंपाऊंड, शेड, गॅरेज, फलक, साईन बोर्ड इ. निष्कासित करण्यात आले. सदर कारवाई मध्ये महानगरपालिकेच्या ३५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तर पोलीस विभागाचे २०० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या कारवाईसाठी १५ जेसीबी, ४ पोकलॅन,१५ टिप्पर, २ रूग्णवाहिका, २ कोंडवाडा





वाहने,२ अग्निशमन बंब,५ इलेक्ट्रिक हायड्रॉलीक वाहने इ. वाहनांचा समावेश होता. सदरील कारवाई मध्ये कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त प्रशांत स्वामी, सुदर्शन पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त धनंजय पाटील, पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, अविनाश आघाव, सुनीता मिसाळ, कुंदन वाघमारे, हरेश्वर घुगे, मनपा सहायक आयुक्त सविता सोनवणे, अशोक गिरी, रमेश मोरे, सय्यद समीउल्लाह,भारत बिरारे, नईम अन्सारी, अर्चना राजपूत, प्राजक्ता वंजारी, अर्जुन गिराम, राहुल जाधव, अतिक्रमण समनव्य अधिकारी संजय सुरडकर व इमारत निरीक्षक कुणाल भोसले,शिवम घोडके,सागर श्रेष्ठ, तृप्ती जाधव,सय्यद जमशेद, सय्यद मजहर अली, नगररचना विभागाचे सुरज सवंडकर, शिवानंद नलगीले व नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव सहभागी होते. आज नारेगाव येथे ३० मीटर रुंद रस्त्यावर बाधित मालमत्ता काढण्याची कारवाई सुरू असताना पोलीस आयुक्त श्री प्रवीण पवार यांनी पाहणी दिली. त्यांनी पोलीस बळाला सूचना केल्या व नागरिकांशी संवाद साधला. रस्ता रुंदीकरणाची मोहिमेत नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यामुळे पोलीस आणि महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी यांचे मनोबल वाढले.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला नवीन वाहने आणि यंत्रसामग्री-प्रशासनाच्या कार्यक्षमतेत वाढ

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कामकाजात अधिक गती व कार्यक्षमता यावी, या उद्देशाने आज दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते नव्याने खरेदी करण्यात आलेल्या विविध वाहनांचा व यंत्रसामग्रीचा उदघाटन संपन्न झाला. यावेळी उप आयुक्त नंदकिशोर भोंबे, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, उप अभियंता सचिन वायकर व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



**बोलेरो वाहने – [illegible] कामकाजासाठी नवसंजीवनी**

महानगरपालिकेच्या ताफ्यातील १० जुनी बोलेरो वाहने ही १३–१४ वर्षांहून अधिक वयोमानाची असल्यामुळे वारंवार नादुरुस्त होत होती. तसेच, शासनाच्या नियमांनुसार सदर वाहने पुढील वर्षभरात स्क्रॅप करणे आवश्यक होते. ही गरज ओळखून, सार्वजनिक खरेदी पोर्टलद्वारे मान्यताप्राप्त वितरक मे. रत्नमणी मोटर्स यांच्याकडून प्रति वाहन रु.९,६६,०००/- दराने एकूण रु.९६,६६,०००/- खर्च करून नवीन बोलेरो वाहने खरेदी करण्यात आली आहेत.

ही वाहने कार्यकारी अभियंते, उप आयुक्त इत्यादी अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन वापरासाठी देण्यात येणार आहेत.

**ड्रेनेज व्यवस्थेसाठी अत्याधुनिक रिसायवर मशिन्स**

शहरातील ड्रेनेज संबंधित तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत महानगरपालिकेला २ रिसायवर मशिन्स प्रदान करण्यात आले आहेत. या मशिन्सच्या मदतीने ड्रेनेज जाम होणे, तुंबलेले पाणी काढणे, तसेच सेप्टिक टँक स्वच्छ करण्यास मदत होणार आहे.

या मशिन्समध्ये जेटिंग व व्हॅक्यूम अशा दोन्ही सुविधा उपलब्ध असून, यामुळे विविध तांत्रिक कामे अधिक प्रभावीपणे पार पाडता येणार आहेत.

**शववाहिनी – आरोग्य विभागासाठी नवी सुविधा**

शासनामार्फत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला १ शववाहिनी प्रदान करण्यात आली आहे. ही शववाहिनी आरोग्य विभागाच्या ताब्यात देण्यात येणार असून, मृतदेहांचे व्यवस्थित व सुसज्ज वाहतूक कार्य सोयीस्करपणे पार पाडता येईल.

नवीन वाहने व यंत्रसामग्रीमुळे महानगरपालिकेच्या नागरी सेवा अधिक गतिमान, परिणामकारक व नागरिकाभिमुख होणार असून, प्रशासनाची कार्यक्षमता वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## (पान १ वरुन)

### ‘स्पा सेंटर’च्या नावाखाली शिवसेना...

कुंटणखाना चालवायचा, अशी माहिती समोर आल्याने जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी, पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा देखील दाखल केला आहे.

शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्यात पोलिसांनी याप्रकरणी ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. स्पा सेंटरमध्ये काम करणाऱ्या नागसेन गायकवाड, संतोष इंगळे, रोहन गायकवाड यांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली असून स्पा सेंटरचा मालक सेनेचा पदाधिकारी अमोदसिंग साबळे, मॅनेजर मनोज जांगिड हे दोघे सध्या फरार आहेत. स्पा सेंटरमधून पोलिसांनी चार महिलांची सुटका देखील केली आहे. तसेच, १६ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत भाग्यनगर पोलिसांनी दोन आरोपीचा शोध सुरू केला असून पुढील अधिक तपास सुरू आहे.

### सार्वभौम देशांना त्यांचे व्यापार....

व्यापारी, व्यापर आणि आर्थिक सहकार्यासाठीचे भागीदार निवडीचा आणि एखाद्या विशिष्ट देशाच्या हितासाठी त्यांच्याबरोबर व्यापार आणि आर्थिक संबंध कोणत्या स्वरूपाचे हवेत हे निवडण्याचा अधिकार असला पाहिजे आणि तो आहे.’ मॉस्कोने युक्रेनबरोबरील संघर्ष संपवण्यासाठी पावले उचलली नाहीत तर रशियावर आणि रशियाकडून एनर्जी एक्सपोर्ट्स खरेदी करणारे देश यांच्यावर नव्याने बंधने लादणार असल्याची घोषणा ट्रम्प यांनी शुक्रवीर केली आहे. असे असले तरी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी युद्धाबाबत त्यांची भूमिका जराही बदललेली नाही.

### मनसेसोबत युतीचा निर्णय पक्ष घेईल,...

असं उद्धव ठाकरे म्हणाले. राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्याने पालिका निवडणुकीत बहुमत प्राप्त करू असं खासदार राऊत यांनी म्हटलं आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिकमध्ये बहुमत प्राप्त करू असं संजय राऊत यांनी म्हटलंय. एकाअर्थी राऊत यांनी दोन्ही भाऊ एकत्र येत असल्याचंच सुतोवाच केलं.

### स्टार्टअपसाठी उद्योजगता धोरण,...

केली जाईल, त्यात मुले व मुलींनाही कर्ज देऊ, असेही मंत्री महोदयांनी सांगितले. केंद्राच्या स्टार्टअप योजनेचे लाभ देण्यासाठी देखील आपण मदत करू. स्टार्टअपमध्ये फेल्युअर अधिक होते, अशात, मुलामुलींचे वय वाया जात होते. मात्र, ह्या योजनेच्या माध्यमातून वय वाया जाणार नाही याची आपण काळजी घेऊ, असेही मंत्री लोढा यांनी म्हटले.

### सर्वधर्म समभाव म्हणजे नपुंसकपणा...

संभाजी महाराज यांच्यात साम्य काय तर, संभाजी महाराज हे शिवाजी महाराज यांच्या तोडीस तोड व्यक्तिमत्व होते. संभाजी महाराज यांच्या पत्नीचा भाऊ गणोजी शिर्के हा नालायक माणूस होता, ज्याने वतनासाठी शेण खाल्ले, असे संभाजी भिडे यांनी म्हटले.

खग्रास ग्रहणाच्या काळात मनुष्याने एखाद्या मंत्राचा जप केला तर त्याला त्या मंत्राची शक्ती जन्मोजन्मीसाठी प्राप्त होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी गायत्री मंत्राचा जप केला होता. मंत्राचे पठण करताना ते अंगावरचे कपडे काढून मानेपर्यंत शीत (थंड)पाण्यात काही तास होते. त्यांच्या मृत्यूवेळी ३ एप्रिल रोजी त्यांना ताप असाह्य झाला तोंडावाटे पाणी दिलेले शरीरातून बाहेर पडत होते. शरीर पूर्ण खचले होते. शिवाजी महाराज हे उपस्थित असलेल्यांना म्हणाले की, आम्ही जातो आमचा काळ झाला. सप्तसिंधू, सप्तगंगा मुक्त करा, हे त्यांचे शेवटचे शब्द होते, असा दावा संभाजी भिडे यांनी केला.

### आरती साठे मुंबई उच्च....

तसेच चेक अँड बॅलन्स राहावा यासाठी संविधानात सेपरेशन ऑफ पॉवरचे तत्व अवलंबले आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे सेपरेशन ऑफ पॉवरच्या तत्त्वाला आणि पर्यायाने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? असे रोहित पवार म्हणाले.